| Publication : Pudhari | Edition : Pune |
|---|---|
| Date : September 03, 2018 | Page: 9 |




१) व २) इथिओपियाच्या विजेत्या स्पर्धकांसह भारतीय विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरण करताना सातारा हिल हाफ मॅरेथॉनचे संयोजक, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरीश पाटणे, तालीम संघाचे अध्यक्ष साहेबराव पवार आदी.

# सातारा मॅरेथॉनवर इथिओपियाचा पुन्हा झेंडा

## मांढरदेवचा आदिनाथ भोसले भारतीय पुरुषांत प्रथम, तर जनाबाई हिरवे महिलांमध्ये तृतीय

**सातारा : प्रतिनिधी**

गिनीज वर्ल्ड ऑफ बुकमध्ये नोंद झालेली पीएनबी मेटलाईफ सातारा हिल हाफ मॅरेथॉन रविवारी दिमाखात पार पडली. ८ हजारांपेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत गतवर्षीप्रमाणेच इथिओपियाच्या धावपटूंनी याही वर्षी सरस कामगिरी करत पुरुष व महिला गटात आपले वर्चस्व कायम ठेवले. विशेष म्हणजे इथिओपियाच्या धावपटूंबरोबरच सातारकर धावपटूंनी पाठोपाठ मॅरेथॉन पूर्ण केल्याने सातारकरही 'हम भी किसीसे कम नही' अशा जोशात धावले. मांढरदेवचा आदिनाथ भोसले हा भारतीय पुरुष गटात प्रथम, खिंडवाडीचा स्वप्नील सावंतने द्वितीय तर भारतीय महिला गटात जनाबाई हिरवे तृतीय क्रमांक पटकावला.

पीएनबी मेटलाईफ सातारा हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धेसाठी इथिओपिया, केनिया, फिनलँड, जर्मनी, इंग्लड, केनिया यासह अन्य देशातील ६० धावपटूंनी सहभाग घेतला होता.